
# मेहतांकडून जमिनींचे नियमबाह्य एकत्रीकरण

## विरोधी पक्षनेते विखे पाटील यांचा आरोप

**म. टा. विशेष प्रतिनिधी,** मुंबई

गृहनिर्माणमंत्री प्रकाश मेहता यांनी घाटकोपर येथील संक्रमण शिबिरासाठीची जागा व या परिसरातील सहा झोपडपट्ट्यांचे जानेवारीमध्ये नियमबाह्य एकत्रिकरण केले. एका अनधिकृत बांधकामाच्या प्रकरणात मेहता यांच्या पत्नीचे नाव आहे; मात्र पोलिस 'एफआयआर'मध्ये हे नावच बदलण्यात आले. तसेच त्यांनी घाटकोपरच्या किरोळ येथील एसआरए योजनेत मुलगा व नातेवाईकांना बोगस भाडेकरू बनवून त्यांच्या नावावर सदनिका लाटल्या, असे घणाघाती आरोप विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी शुक्रवारी केले.




मेहता यांची अनेक भ्रष्टाचाराची प्रकरणे चव्हाट्यावर येत आहेत. विखे पाटील यांनी त्यांच्या भ्रष्टाचाराची कागदपत्रे प्रसारमाध्यमांना दिली. नियम ३३ (१४)अंतर्गत मंजूर करण्यात आलेली घाटकोपर येथील योजना रद्द करण्यात आली होती; परंतु सदर योजना ३३(१०)मध्ये रूपांतरित करून याच परिसरातील सहा झोपडपट्ट्यांचा एकत्रित पुनर्विकास करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला. हा प्रस्ताव मेहता यांनी नियमबाह्यरीत्या मंजूर केला, असा आरोप विखे यांनी केला. मुळात संक्रमण शिबिरांची जागा आणि झोपडपट्ट्यांची जमीन एकत्र करताच येत नाही. इतक्या महत्त्वाच्या निर्णयात एसआरएचे प्रमुख असलेल्या मुख्यमंत्र्यांना वगळण्याची एका मंत्र्याची हिंमत होतेच कशी, असा सवाल त्यांनी केला.

### एफआयआरमधील नाव बदलले

सम्यकदर्शन, घाटकोपर येथील गृहनिर्माण सोसायटीत गृहनिर्माणमंत्र्यांची पत्नी किशोरी मेहता यांच्या नावे फ्लॅट आहे. त्यांनी या सदनिकेत अनधिकृत बांधकाम केले. त्याबाबत महापालिकेत तक्रार दाखल करण्यात आली. पंतनगर पोलिस ठाण्यात त्यांच्या पत्नीविरोधात एफआयआरही आहे. परंतु या कारवाईतून वाचविण्यासाठी मेहता यांनी एफआयआरमध्ये किशोरी मेहताऐवजी किशोर मेहता असा बदल करण्यासाठी पोलिसांवर दबाव आणला, असे विखे पाटील यांनी सांगितले.

### सदनिका लाटल्या

किरोळ, घाटकोपर येथील एसआरए योजनेत मेहता यांनी मुलगा व नातेवाईकांना बोगस भाडेकरू बनविले व सदनिका लाटल्या. मुकेश दोशी हे कोण आहेत, त्यांच्याशी गृहनिर्माणमंत्र्यांचा काय संबंध आहे, असा प्रश्न विखे पाटील यांनी विचारला.

# राजीनाम्यासाठी विरोधक आक्रमक

**म. टा. विशेष प्रतिनिधी,** मुंबई

गृहनिर्माणमंत्री प्रकाश मेहता यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी विरोधकांनी शुक्रवारी सकाळपासूनच आक्रमक पवित्रा घेतला. विधिमंडळाची दोन्ही सभागृहे विरोधकांनी जोरदार घोषणाबाजीने दणाणून सोडली. त्यामुळे विधान परिषदेचे कामकाज दिवसभरात तब्बल सात वेळा, तर विधानसभेचे कामकाज चारवेळा तहकूब करावे लागले.

मुंबईसह २७ महापालिकांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी २६० अन्वये प्रस्ताव विधान परिषदेत मांडण्यात आला. या प्रस्तावावरील चर्चेस विरोधकांनी विरोध दर्शवला. गृहनिर्माण सोसायट्या व त्यांचा रखडलेला पुनर्विकास यावर आधारित प्रस्ताव असून हा विभाग मेहता यांच्या अखत्यारीत येतो. परंतु, त्यांच्यावर घोटाळ्याचे आरोप असल्याने प्रथम त्यांचा राजीनामा घ्यावा व मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात निवेदन करावे, अशी जोरदार मागणी करत विरोधकांनी गोंधळ घातला. त्यावर महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मेहतांसंदर्भात मुख्यमंत्री मंगळवारपर्यंत उत्तर देतील, असे सांगत विरोधकांकडून सभागृहाची आचारसंहिता पाळली जात नाही अशी टीका केली.

घाटकोपरमधील संक्रमण शिबिराची आणि एसआरएची जागा एकत्रित करून विकासकाला अधिकचा फायदा मिळवून देण्याचा प्रयत्न मेहता यांनी केल्याची माहिती विखे यांनी सभागृहाला दिली. मात्र त्यांना अधिक बोलू न दिल्याने विरोधक संतप्त झाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जयंत पाटील यांनी सरकारकडून मेहतांना पाठिशी घालण्याचा प्रकार सुरू असून हा योग्य प्रकार आहे का, असा सवाल केला. यावर संसदीय कार्यमंत्री गिरीश बापट यांनी प्रश्नोत्तराचा तास होऊ द्या, अशी सूचना विरोधकांना केली. तरीही विरोधकांकडून गोंधळ सुरूच राहिला. तसेच अध्यक्षांकडून कामकाज पुढे रेटले जात असल्याने विरोधकांनी अध्यक्षांसमोरील मोकळ्या जागेत येत मेहता यांच्या नावे असलेला फलक फडकावित 'गुंडा सरकार हाय हाय' अशा घोषणा देण्यास सुरुवात केली. यातच सभागृहाचे कामकाज चारवेळा तहकूब करावे लागले.

### सुभाष देसाईंवर आरोप

२०१६ साली मॅग्नेटिक महाराष्ट्र करार करण्यात आले. पण उद्योगधंद्याना हवी असलेली जमीन मिळत नव्हती. त्यामुळे एमआयडीसीतील अधिसूचित जमिनीपैकी ६० टक्के जमीन वगळण्याचा निर्णय उद्योगमंत्र्यांनी घेतल्याचा आरोप धनंजय मुंडे यांनी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांचे नाव न घेता केला. त्यामुळे आणखी एक प्रकरण उघडकीस आल्याचे मुंडे म्हणाले.

### मुख्यमंत्री म्हणाल्यास राजीनामा

विरोधकांनी सभागृहांमध्ये केलेले आरोप मेहता यांनी फेटाळून लावले आहेत. घाटकोपरच्या पंतनगरमधील म्हाडाचा भूखंड म्हाडाच्याच ताब्यात असून, तो विकासकाला दिलेला नाही. सहा झोपडपट्ट्या आणि संक्रमण शिबीर अशी एकत्रित मंजुरी दिलेली नाही. घाटकोपर येथे एसआरए इमारतीत मुलाला दोन फ्लॅट मिळणे अपेक्षित आहे. कारण तिथे त्याच्या नावावर दोन खोल्या होत्या, असा खुलासा मेहता यांनी केला आहे. तरीही विरोधक म्हणतात म्हणून नव्हे, तर मुख्यमंत्र्यांनी सांगितल्यास मी राजीनामा देण्यास तयार आहे, असे मेहता म्हणाले.

# राज्यात ४ नवी कॅन्सर रुग्णालये

**म. टा. विशेष प्रतिनिधी,** मुंबई



राज्यातील नाशिक, अमरावती, लातूर आणि नागपूर या ठिकाणी अत्याधुनिक कॅन्सर रुग्णालये सुरू करण्याचा निर्णय सरकारने घेतल्याची माहिती आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत यांनी तारांकित प्रश्नावर लेखी उत्तरात दिली. आमदार जयवंतराव जाधव, अमरसिंह पंडित, धनंजय मुंडे यांनी कॅन्सर रुग्णालयांबाबत प्रश्न विचारला होता.

कॅन्सरबाधित रुग्णांवर मुंबईतील परळ येथील टाटा रुग्णालयात उपचार होतात. कॅन्सरवर उपचार करणारे हे एकमेव रुग्णालय असल्याने राज्यासह विविध देशांतून रुग्ण येत असतात. याच धर्तीवर राज्य सरकारने नाशिक, अमरावती, नागपूर आणि लातूर येथे तृतीय सेवा अत्याधुनिक कॅन्सर रुग्णालय सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूर येथे राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅन्सर रुग्णालय, लातूरमधील विवेकानंद फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर आणि रिजनल रेफरन्स रुग्णालय नाशिक या तीन रुग्णालयांचे प्रस्ताव केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले आहेत. त्यापैकी नागपूरच्या संस्थेचा प्रस्ताव मंजूर झाला असून, उर्वरित दोन प्रस्ताव केंद्राकडे प्रलंबित आहेत, असे डॉ. सावंत म्हणाले.

# प्रकाश मेहतांच्या अटकेची मागणी

**म. टा. विशेष प्रतिनिधी,** मुंबई

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जलवाहिन्यांलगतच्या झोपड्यांवरील मुंबई महापालिकेच्या कारवाईत आडकाठी आणल्याबद्दल गृहनिर्माणमंत्री प्रकाश मेहता यांच्याविरुद्ध वॉरंटविना अटकेची कारवाई करावी, अशी मागणी जनहित याचिकादार भगवानजी रयानी यांनी शुक्रवारी उच्च न्यायालयात केली. मात्र, यासंदर्भात आधी युक्तिवाद करा, असे सांगून न्यायालयाने सुनावणी पुढे ढकलली.

मेहता यांनी घाटकोपर येथील आपल्या मतदारसंघातील झोपड्यांविषयी कारवाई होणार असताना पालिकेच्या कर्मचाऱ्यांना पोलिस संरक्षण मिळण्यात आडकाठी आणली. त्यासाठी ते स्वत: पोलिस ठाण्यात गेले, असा त्यांच्यावर आरोप आहे. या हस्तक्षेपाविषयीची बाब पालिकेच्याच प्रतिज्ञापत्रातून उघड झाली होती. त्यामुळे हा विषय न्या. अभय ओक व न्या. विभा कंकणवाडी यांच्या खंडपीठासमोर पुन्हा सुनावणीस आला असता, याचिकादारांनी मेहतांवर अटकेच्या कारवाईची मागणी केली. मात्र, मेहता यांनी याविषयी प्रतिज्ञापत्र दाखल करून आपली भूमिका मांडली असल्याने आधी तुम्ही प्रतिज्ञापत्राचा अभ्यास करून युक्तिवाद करा, त्यानंतर पाहू, असे खंडपीठाने स्पष्ट केले. तसेच रयानी यांना प्रतिज्ञापत्राची प्रत देण्याचे निर्देश सरकारी वकिलांना दिले.







NOTICE

Bayer Cropscience Ltd

Regd. Office: Bayer House, Central Avenue, Hiranandani Estate, Thane (W), Mumbai – 400607

NOTICE is hereby given that the certificate for the undermentioned securities of the Company have been lost/mislaid and the holder of the said securities / applicant have applied to the Company to issue duplicate certificate.

Any person who has a claim in respect of the said securities should lodge such claim with the Company at its Registered Office within 15 days from this date, else the Company will proceed to issue duplicate certificate without further intimation.

| Name of Holder | Kind of Securities and face value | No. of Securities | Distinctive Number |
|---|---|---|---|
| Nalini Jayantilal Randeria | Equity shares of ₹ 10/- each | 280 | 8800581-8800860 |

Ahmedabad August 2, 2017 Nalini Jayantilal Randeria


# टीईटी आता अनिवार्य

**म. टा. विशेष प्रतिनिधी,** मुंबई

राज्यातील शिक्षकांची गुणवत्ता वाढावी यासाठी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या अधिसूचनेद्वारे प्राथमिक शिक्षकांसाठी किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता निश्चित केली असून 'शिक्षक पात्रता परीक्षा' (टीईटी) अनिवार्य केली असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली.

राज्यातील शिक्षकभरतीसाठी टीईटी परीक्षा अनिवार्य करण्यात आल्याबाबतचा प्रश्न सदस्य प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत उपस्थित केला होता. यास उपप्रश्न सदस्य चंद्रदीप नरके यांनी विचारला होता. तावडे म्हणाले, डी. एड्. आणि बी. एड्. ही शैक्षणिक योग्यता असून, टीईटी ही पात्रता परीक्षा आहे. शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे ती लागू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करून, गुणवत्तापूर्ण शिक्षक मिळावेत, हा यामागचा उद्देश आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थासह खासगी व्यवस्थापनाच्या अनुदानित, अंशत: अनुदानित व अनुदानास पात्र घोषित केलेल्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी परीक्षेतील गुणांच्या आधारे शिक्षण सेवक भरती करण्याबाबत सरकारी निर्णय पारित केला होता. सदर परीक्षा यात प्रस्तावित केल्यानुसार सहा महिन्यांच्या आत घेण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचेही तावडे यांनी लेखी उत्तरात म्हटले आहे.

### पाणीपुरवठ्यासाठी योजना

९९६ गावे, वाड्या आणि वस्त्यांसाठी पाणीटंचाईसाठी तीन कोटी ६९ लक्ष किमतीचा आराखडा बनवण्यात आला आहे. तसेच ५१२ वाड्या-वस्त्यांसाठी दोन कोटी ५६ लक्ष असे एकूण एक हजार ४७६ वाड्या-वस्त्यांसाठी सहा कोटी २५ लाखांच्या टंचाई आराखड्यान्वये संबंधित गावात पाणीपुरवठ्याच्या उपाययोजना करण्यात आल्या असल्याची माहिती पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री बबनराव लोणीकर यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली.

# लवासा प्रकरण; ३ महिन्यांत अहवाल

**म. टा. विशेष प्रतिनिधी,** मुंबई

पुणे येथील लवासा शहरांतर्गत पर्यावरणाचा ऱ्हास, अनधिकृत बांधकाम आणि प्रदूषणाबाबत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास चौकशी करण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. तीन महिन्यांत यासंदर्भातील अहवाल सादर करण्यात येणार असल्याची माहिती विधानसभेत पर्यावरणमंत्री रामदास कदम यांनी शुक्रवारी दिली.

मुळशी जिल्हा पुणे लवासा शहरांतर्गत सुरू असलेल्या अनधिकृत कामांसंदर्भात सदस्य भीमराव तापकीर यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. त्यास उत्तर देताना कदम बोलत होते. यावेळी सदस्य बाबूराव पाचर्णे यांनी उपप्रश्न उपस्थित केला होता. कदम पुढे म्हणाले, लवासा शहरासाठी पूर्वी विशेष नियोजन प्राधिकरण नेमले होते. मात्र ते रद्द करून आता लवासा शहरांतर्गत सर्व शासकीय अधिकार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना देण्यात आले आहेत. लवासाचा संपूर्ण ताबा पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे असून, लवासासंदर्भातील संपूर्ण चौकशी प्राधिकरणामार्फत करण्यात येणार.

### पाण्याची तपासणी

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील किनारपट्टीलगत असलेल्या गावांमधील पिण्याच्या पाण्याची रासायनिक तपासणी करून स्वतंत्र आराखडा तयार करण्यासंदर्भातील सूचना देण्यात येतील, असे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत सांगितले. सिंधुदुर्गमधील तळाशील, आचरा व पोळम या गावांतील नागरिकांना क्षारयुक्त पाणी प्यावे लागत असल्याबाबतचा प्रश्न सदस्य वैभव नाईक यांनी विचारला होता. त्यास उत्तर देताना लोणीकर बोलत होते. सदस्य आशीष शेलार यांनी उपप्रश्न उपस्थित केला होता.




GODFREY PHILLIPS INDIA LIMITED

REGISTERED OFFICE : 'Macropolo Building', Ground Floor, Next to Kala Chowky Post Office, Dr. Babasaheb Ambedkar Road, Lalbaug, Mumbai – 400 033

CORPORATE OFFICE : 49, Community Centre, Friends Colony, New Delhi – 110 025

CIN : L16004MH1936PLC008587

Website : www.godfreyphillips.com; Email : isc-gpi@modi.com

NOTICE

Pursuant to Regulation 29(1)(a) read with Regulation 47(1)(a) of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, it is hereby notified that a Meeting of the Board of Directors of the Company will be held on Saturday, the 12th August, 2017 at 4:00 P.M. to, inter-alia, consider, approve and take on record of the Standalone Unaudited Financial Results for the first quarter ended 30th June, 2017.

The information contained in this notice is also available on the Company's Corporate, website www.godfreyphillips.com and on the website of the stock exchanges, www.bseindia.com and www.nseindia.com.

For GODFREY PHILLIPS INDIA LIMITED
Sd/-
(SANJAY GUPTA)
COMPANY SECRETARY

Place : New Delhi
Dated : 5th August, 2017



प्रपत्र—ए

जाहीर घोषणा

ही जाहीर घोषणा या वर्तमानपत्रामध्ये पृष्ठ क्र.९ वर दिनांक ४ ऑगस्ट २०१७ रोजी प्रसिध्द झालेल्या घोषणेऐवजी पुनर्स्थापित होईल आणि एबीजी शिपयार्ड लिमिटेड साठी नादारीच्या प्रारंभाची तारीख १ ऑगस्ट २०१७ मान्य करण्यात येत आहे आणि दावे सादर करण्याची तारीख पूर्वीचीच राहील.

(इनसॉल्वन्सी अ‍ॅण्ड बॅंकरप्सी बोर्ड ऑफ इंडिया (इनसॉल्वन्सी रिझोल्युशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या नियम ६ अंतर्गत)

"एबीजी शिपयार्ड लिमिटेड" च्या ऋणदात्यांच्या लक्षवेधासाठी

| संबंधित विवरण | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदार | एबीजी शिपयार्ड लिमिटेड |
| २ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख | १५ मार्च १९८५ |
| ३ | कॉर्पोरेट कर्जदार कोणत्या प्राधिकरणाअंतर्गत स्थापन/ नोंदणीकृत झाला आहे | कंपनी निबंधक, अहमदाबाद |
| ४ | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | CIN: L61200GJ1985PLC007730 |
| ५ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि मुख्य कार्यालयाचा (असल्यास) पत्ता | नोंदणीकृत कार्यालय: एबीजी शिपयार्ड लिमिटेड, मगडैला पोर्टजवळ, दुमास रोड, सूरत ३९५००७, गुजरात; कॉर्पोरेट कार्यालय: एबीजी शिपयार्ड लिमिटेड, दुसरा मजला, भूपति चेंबर्स १३, मॅथ्यु रोड, मुंबई ४००००४ |
| ६ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संबंधी नादारीच्या प्रारंभाची तारीख | ०१.०८.२०१७ (सी.पी. (आय.बी.) क्र.५३/७/ एनसीएलटी/एएचएम/२०१७ मधील एनसीएलटीच्या दिनांक ०१.०८.२०१७ च्या आदेशानुसार) |
| ७ | नादारीच्या ठरावाच्या प्रक्रियेच्या समाप्तीची अंदाजे तारीख | नादारीच्या प्रारंभाच्या तारखेपासून १८० दिवस म्हणजेच २८.१.२०१८ |
| ८ | अंतरिम ठराव व्यावसायिकाचे नांव, पत्ता, ईमेल पत्ता आणि नोंदणी क्रमांक | नांव: सुंदरेश भट; पत्ता: बीडीओ रिस्ट्रक्चरिंग अ‍ॅडव्हायसरी एलएलपी, दि रुबी — लेवल ९, एनडब्ल्यु विंग, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई ४०००२८. ईमेल: irp.abg@bdo.in; नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP- POOO77/ 2017-18/ 10162 |
| ९ | दावे सादर करण्याची शेवटची तारीख | १६.०८.२०१७ |

याद्वारे सूचना देण्यात येते की, मा. राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरण, अहमदाबाद न्यायपीठाने दिनांक १ ऑगस्ट २०१७ च्या आदेशान्वये एबीजी शिपयार्ड लिमिटेड यांच्याविरुध्द दिनांक १ ऑगस्ट २०१७ रोजी कॉर्पोरेट नादारी ठरावाची प्रक्रिया प्रारंभ करण्याचा आदेश दिला आहे.

मे. एबीजी शिपयार्ड लिमिटेड यांच्या ऋणदात्यांना याद्वारे कळविण्यात येते की त्यांनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे अंतरिम ठराव व्यावसायिकास त्यांच्या परिच्छेद क्र.८ समोर दिलेल्या पत्त्यावर दिनांक १६ ऑगस्ट २०१७ किंवा त्यापूर्वी सादर करावेत.

दाव्यांच्या पुराव्यांचे सादरीकरण, इनसॉल्वन्सी अ‍ॅण्ड बॅंकरप्सी बोर्ड ऑफ इंडिया (इनसॉल्वन्सी रिझोल्युशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या खंड—४ च्या अनुसार करावे. दाव्यांचे पुरावे पुढे विहीत केलेल्या प्रपत्रांद्वारे, प्रतिज्ञापत्र आणि दाव्यांच्या समर्थनार्थ कागदोपत्री पुराव्यांसह सादर करावेत. प्रपत्र बी—कामगार आणि कर्मचारी वगळता ऑपरेशनल ऋणदात्यांचे दावे, प्रपत्र सी— वित्तीय ऋणदात्यांचे दावे, प्रपत्र डी—कामगार किंवा कर्मचाऱ्यांचे दावे आणि प्रपत्र ई—कामगार आणि कर्मचाऱ्यांचे अधिकृत प्रतिनिधी. वरील प्रपत्रे इनसॉल्वन्सी अ‍ॅण्ड बॅंकरप्सी बोर्ड ऑफ इंडिया (इनसॉल्वन्सी रिझोल्युशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ यांच्या www.ibbi.gov.in या वेबसाईटवरुन डाऊनलोड करता येतील.

वित्तीय ऋणदाते हे त्यांच्या दाव्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पध्दतीने सादर करु शकतील. ऑपरेशनल ऋणदाते तसेच कामगार आणि कर्मचारी हे दाव्यांचे पुरावे व्यक्तीश:, डाकेने किंवा इलेक्ट्रॉनिक पध्दतीने सादर करु शकतील. आयबीसीच्या कलम १४ अंतर्गत सदर कॉर्पोरेट कर्जदाराच्या विरुध्द सर्व प्रकारचे दावे, वसूली, कारवाई प्रतिबंधित करण्यासाठी अधिस्थगन दिनाक १ ऑगस्ट २०१७ रोजीपासून कॉर्पोरेट इनसॉल्वन्सी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत किंवा कलम ३१ च्या उपकलम (१) अंतर्गत हे न्यायपीठ ठराव योजना मंजूर करेपर्यंत किंवा कलम ३३ अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराच्या अवसायनाचा आदेश पारित होईपर्यंत, यांपैकी जे आधी होईल, तोपर्यंत आदेशित केले आहे.

दाव्यांचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकर्षित होईल.

सही/—
सुंदरेश भट
अंतरिम ठराव व्यावसायिक
IBBI/IPA-001/IP-P00077/2017-18/10162

दिनांक: ०४/०८/२०१७
स्थळ: मुंबई



